# लीलावतीची लेक...



कण भौतिकशास्त्रातील ज्येष्ठ संशोधिका प्रा. रोहिणी गोडबोले यांचे वयाच्या बहात्तराव्या वर्षी, दि. २५ ऑक्टोबर २०२४ रोजी पुणे येथे निधन झाले. प्रा. गोडबोले यांचा जन्म दि. १२ नोव्हेंबर १९५२ रोजी पुण्यात झाला, तसेच त्यांचे शालेय व पदवीपर्यंतचे शिक्षणही पुण्यातच झाले. भौतिकशास्त्रातील एम.एस्सी. ही पदव्युत्तर पदवी आयआयटी (मुंबई) येथून मिळवल्यानंतर अमेरिकेतील स्टोनी ब्रुक विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. पदवी मिळवली. त्यानंतर भारतात परतून त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेत संशोधन केले. तसेच मुंबई विद्यापीठातही त्यांनी भौतिकशास्त्राचे अध्यापन केले. बंगळुरूच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या संस्थेत प्रा. गोडबोले यांनी १९९५ ते २०१८ इतका दीर्घकाळ संशोधन व अध्यापन केले. त्यांनी मूलकणांबरोबर, डार्क मॅटर, सुपर सिमेट्री या विषयांमध्येही मोलाचे संशोधन केले. त्यांचे शंभराहून अधिक शोधनिबंध अनेक प्रख्यात आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत प्रकाशित झाले आहेत. त्यांनी १४ पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी मार्गदर्शनसुद्धा केले आहे.

जर्मनी येथे त्यांनी दीर्घ वास्तव्य केले व संसारसुद्धा थाटला! पण त्यांचा मूळचा शिक्षिकेचा पिंड काही गेला नाही. भारतातच राहायचे, इथेच संशोधन करायचे व आपल्या विद्यार्थ्यांना तयार करायचे हा विचार सातत्याने त्या मांडायच्या. परदेशी गेल्यास सुविधा नक्की मिळतील, पण परिस्थिती कितीही विषम असली तरी काम आपल्या देशातच करायचे, यावर त्या नेहमी ठाम होत्या. याच दरम्यान त्यांनी कण भौतिकशास्त्र या विषयावर अनेक पदरी संशोधन केले. त्यातूनच गोडबोले-पांचेरी प्रारूप किंवा ड्रिस-गोडबोले परिणाम असे त्यांचे विविध महत्त्वपूर्ण शोधनिबंध प्रसिद्ध झाले व या विषयातील तज्ज्ञ म्हणून त्यांना जगन्मान्यता मिळाली. त्या पलीकडे जाऊन प्रा. गोडबोले यांनी जे उल्लेखनीय कार्य केले, ते म्हणजे भारतीय तसेच जागतिक संशोधन क्षेत्रात मुलींना मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीविषयी जागृती करण्याचे. महिला संशोधकांना घर-परिवार, मुले सांभाळून आपले कार्य करता यावे, याकरिता प्रा. गोडबोले यांनी अनेक प्रकल्प राबवले व शासकीय धोरण मुलींसाठी पूरक असावे याचा पाठपुरावा केला. शंभराहून अधिक भारतीय महिला संशोधकांचे योगदान अधोरेखित करण्याचे काम त्यांनी आपल्या 'लीलावतीज डॉटर्स' या संग्रहाद्वारे सर्वांसमोर आणले.

सत्येंद्रनाथ बोस पदक, पद्मश्री, आयआयटी कानपूरची मानद डॉक्टरेट, तसेच फ्रेंच सरकारचा ऑर्डर ऑफ मेरिट, इत्यादी पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. अशा मानाच्या पुरस्कारांनी सन्मानित व्यक्तीसोबत आपण आहोत, याची कल्पनाही येणार नाही एवढ्या सहजपणे त्या सर्वांत मिसळायच्या. मराठी विज्ञान परिषदेनेही त्यांना आपले मानद सदस्यत्व देऊन गौरवले होते. विज्ञान प्रसाराचे कार्य करणाऱ्या संस्थांत त्यांना रुची होती. मराठी विज्ञान परिषदेतर्फे दिला जाणारा २०२४ सालचा डॉ. रघुनाथ माशेलकर जीवनगौरव पुरस्कार त्यांना जाहीर झाला होता. भारतीय महिला शास्त्रज्ञांच्या कार्याला समान संधी मिळायला हवी यासाठी संघर्ष करणाऱ्या, अत्यंत तळमळीच्या शिक्षिका असणाऱ्या प्रा. रोहिणी गोडबोले यांना मराठी विज्ञान परिषदेतर्फे विनम्र श्रद्धांजली!

— **अभय देशपांडे**, abhaypd@gmail.com